पुण्यनगरी ५.पा.१.

## महिला सुरक्षा व सक्षमीकरणावर मार्गदर्शन

**। मीरा रोड** : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात पोलीस रेझिंग डेनिमित्त मीरा रोड येथील एल. आर. तिवारी कॉलेजला भेट देत कॉलेजमधील अभियांत्रिकी शाखेच्या सुमारे १५० विद्यार्थ्यांना महिला सुरक्षा, महिला सक्षमीकरण या विषयावर मार्गदर्शन करून त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांना काही अडचण असल्यास ११२ या हेल्पलाईनवर किंवा पोलीस ठाण्याचे नंबर, पोलीस काका, पोलीस दीदी यांच्या नंबरवर संपर्क साधण्याच्या सूचना देऊन योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी भरोसा सेलच्या स.पो.नि. तेजश्री शिंदे, महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहल तांबडे, महिला पोलीस अंमलदार निंबाते, महिला पोलीस अंमलदार धांगडा, शिंदे व गणेश चकोर इत्यादी उपस्थित होते.

## वसईचा जुना अंबाडी रेल्वे पूल वाहतुकीसाठी दहा दिवस बंद

**। वसई** : वसई पूर्व-पश्चिम जोडणारा रेल्वेचा जुना उड्डाणपूल पुन्हा दुरुस्तीसाठी दहा दिवस बंद करण्यात आला आहे. त्यामुळे या पुलावरून होणारी वाहतूक बाजूच्या नव्या उड्डाणपुलावरून वळण्यात आली आहे. वसईतून महामार्गावर जाण्यासाठी हा महत्त्वाचा मार्ग असल्याने वाहनांची मोठी वर्दळ या पुलावर असते. परिणामी, या पुलावर वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढणार आहे. डिसेंबर महिन्यातही तीन दिवसांसाठी दुरुस्तीसाठी हा पूल बंद करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा दुरुस्तीच्या कामासाठी २ ते १२ जानेवारी या १० दिवसांच्या कालावधीसाठी जुना पूल बंद करण्यात आला आहे. पुलाच्या पिलरचे काम या काळात करण्यात येत आहे.

# संपाच्या पार्श्वभूमीवर वीज वितरण विभाग सज्ज

**। नालासोपारा ।** महावितरणमधील कर्मचारी, अधिकारी व अभियंत्यांच्या विविध संघटना बुधवारी मध्यरात्रीपासून ६ जानेवारीपर्यंत ७२ तासांच्या संपावर जात आहेत. या संपाच्या पार्श्वभूमीवर कल्याण परिमंडलातील ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक तयारी मुख्य अभियंत्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. मुख्य कार्यालयाच्या निर्देशानुसार, परिमंडलातील कल्याण एक आणि दोन, वसई व पालघर या चारही मंडल कार्यालयांत संप काळासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. संपाच्या कालावधीत वीजपुरवठा बाधित होणे, अपघात, वीज यंत्रणेचे नुकसान अथवा अपघात यासंदर्भात आपापल्या कार्यक्षेत्रातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून माहिती देण्याचे व सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे. कर्मचारी, अधिकारी, अभियंते तसेच कंत्राटी कामगार या संपात सहभागी होत आहेत. त्यामुळे या संपात नसणारे कर्मचारी, अभियंते, अधिकारी याशिवाय देखभाल-दुरुस्तीसाठीच्या एजन्सीसह इतर कंत्राटदारांचे कामगार, सेवानिवृत्त कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांच्या मदतीने संप काळात वीजपुरवठा अबाधित ठेवण्यासाठी नियोजन करण्यात आलेले आहे. वसई, विरार, नालासोपारा, आचोळे, वाडा भागाचा समावेश असलेल्या वसई मंडल कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाचे ७८७५७६०६०१ आणि ७८७५७६०६०२ हे मोबाईल क्रमांक आहेत. नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक संप कालावधीत चोवीस तास सुरू राहणार आहेत. विजेसंदर्भातील तक्रारी व माहिती देण्यासाठी आपापल्या कार्यक्षेत्रातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.

म.टा.५.पा.१.

## कारशेड सुनावणी मिरा-भाईंदरमध्ये

**म. टा. वृत्तसेवा**, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर-दहिसर मेट्रो ९ प्रकल्पाच्या कारशेडची जमीन विकास आराखड्यात आरक्षित करण्याविरोधात दाखल असलेल्या हरकतींवर मिरा-भाईंदरमध्येच सुनावणी घेतली जाणार आहे. याआधी नवी मुंबईत आयोजित केली जाणार असलेली ही सुनावणी शहरातच आयोजित करण्याची ग्रामस्थांची मागणी होती.

राई गावात ३२ हेक्टर जमिनीवर मिरा-भाईंदर-दहिसर मेट्रो-९ व छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ-अंधेरी मेट्रो ७ अ या प्रकल्पांसाठी मेट्रो कारशेडसाठी एमएमआरडीएने आरक्षित केली आहे. ही जमीन विकास आराखड्यातही आरक्षित करण्यासाठी कोकण विभागाच्या सहसंचालकांनी सप्टेंबरमध्ये हरकती व सूचना मागवल्या होत्या. या जागेत कारशेड उभारल्यास शेतजमिनी बाधित होणार असल्याने त्याला विरोध करणाऱ्या १२०० हून अधिक हरकती ग्रामस्थांनी नोंदवल्या होत्या. त्यावर ३० जानेवारीपासून सहसंचालक, कोकण विभाग, नवी मुंबई येथे सुनावणी घेतली जाणार होती. मात्र नवी मुंबईपर्यंत जाणे कठीण असल्याने मिरा-भाईंदरमध्येच सुनावणी घेण्याची मागणी होत होती. ग्रामस्थांनी आमदार प्रताप सरनाईक यांची नुकतीच भेट घेतली होती. त्यांनी कोकण विभागाच्या सहसंचालकांशी चर्चा केल्यानंतर, पालिका मुख्यालयातच सुनावणी घेण्याचे निश्चित केल्याची माहिती ग्रामस्थ अशोक पाटील यांनी दिली.

1

सामना पा.नं.५.

टुकार रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या नावाखाली माथी मारला रोड टॅक्स

# मीरा-भाईंदरकरांचे चालणेही महागणार

**कर्जाच्या परतफेडीसाठी नागरिकांच्या खिशावर डल्ला**

भाईंदर, दि. ३ (सा.वा.) - दर्जेदार शिक्षणाच्या नावाने बोंब तसेच अनेक ठिकाणी मलनिस्सारण व्यवस्था नसताना कराच्या नावाखाली खिशावर डल्ला टाकणारी मीरा-भाईंदर महापालिका आता नागरिकांच्या माथी रोड टॅक्सही मारणार आहे. शहरातील खड्ड्यांनी टुकार झालेले प्रमुख रस्त्यांचे अकराशे पन्नास कोटी रुपये खर्चून कॉंक्रीटीकरण करण्यात येणार असून यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज उचलण्यात आले आहे. या पैशांची व्याजासह परतफेड करण्यासाठी नागरिकांवर रस्ता कर आकारला जाणार आहे. त्यामुळे मीरा-भाईंदरकरांचे चालणेही आता महागणार आहे.

महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी, अधिकारी आणि ठेकेदारांच्या साटेलोट्यामुळे मीरा-भाईंदर शहरातील रस्त्यांची पुरती वाट लागली आहे. त्यातच मेट्रोच्या कामानेही ठिकठिकाणी मार्ग खोदण्यात आल्याने नागरिकांना चालणे मुश्कील होते. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांचे लवकरच कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने सरकारला प्रस्ताव पाठवून कर्ज उचलण्याची परवानगी मागितली. यानुसार राष्ट्रीयीकृत बँकांकडून पाचशे कोटींचे कर्ज घेतानाच एमएमआरडीएकडूनही पाचशे कोटी रुपये घेण्यात येणार आहेत. यात स्वत:चे दीडशे कोटी असे साधारण अकराशे पन्नास कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मात्र स्वत:चा खिसा रिकामा असणाऱ्या महापालिकेने या कर्जाची परतफेड करण्यासाठी नागरिकांच्या खिशावर डल्ला मारण्याचा निर्णय घेतला असून लवकरच रोड टॅक्स लावण्यात येणार आहे. त्यामुळे आधीच विविध करांच्या नावाखाली सहा ते सात हजार रुपये भरणाऱ्या सर्वसामान्यांना आता अधिकचे सहाशे ते सातशे रुपये भरावे लागणार आहेत.

### शहरवासीयांचा आंदोलनाचा इशारा

शिक्षणाच्या नावाखाली राज्य सरकार व महापालिका वेगवेगळे दोन कर आकारते. त्यातच शहरात जवळपास ७० टक्के परिसरात मलनिस्सारण व्यवस्था नसताना मलप्रवास सुविधा लाभ असा कर वसूल केला जातो. आता रोड टॅक्स आकारल्याने शहरवासीय संतप्त झाले आहेत. त्यामुळे हा निर्णय तत्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली असून कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.

पुढारी पा.नं.३.


# भाईंदरमध्ये महिला ठिणगीच्या वतीने आई सन्मानासाठी आंदोलन

## अप्पर तहसील कार्यालयात महिलांचा ठिय्या

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

श्रमजीवी संघटनेंतर्गत महिला ठिणगीच्या वतीने मंगळवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई जयंतीच्या निमित्ताने आई सन्मानासाठी बाळाच्या नावासमोर वडिलांच्या नावासह आईचेही नाव लावण्याची कार्यवाही सर्व सरकारी कार्यालयांमध्ये करण्यात यावी, या मागणीसाठी भाईंदर येथील अप्पर तहसिल कार्यालयांच्या आवारात आंदोलन छेडण्यात आले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रिया व समाजातील वंचित घटकाला शिक्षण देवून त्यांना माणूस म्हणून सन्मानाने जगण्यासाठी अपार कष्ट केले. हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना सन्मानाचा व समानतेचा अधिकार मिळावा, यासाठी श्रमजीवी संघटना गेली अनेक वर्षे लढा देत असल्याचे श्रमजीवीचे मिरा-भाईंदर शहर सचिव महेंद्र शेगावकर यांनी सांगितले. आईच्या गर्भात वाढणाऱ्या बाळाची ओळख जन्मानंतर केवळ त्याच्या वडिलांच्या नावानेच होते. हि महिला सन्मानाची शोकांतिका असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. भारतीय संविधानाने सन्मानाने व समानतेने जगण्याचा अधिकार महिलांकडून तसेच प्रत्येक आईकडून हिरावून घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अप्पर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



### काय आहे आंदोलनकर्त्यांचे नेमके म्हणणे

महिला ठिणगीच्या सदस्यांनी तीव्र निषेध करून सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच दस्तऐवजांवर, जेथे कोणत्याही व्यक्तीचे नाव लिहिण्याची सक्ती असते तेथे सुरुवातीला नाव, वडिलांचे नाव व आडनाव असे तीन कॉलम दर्शविले जातात. यांऐवजी सुरुवातीला नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व शेवटी चार कॉलम निश्चित करावेत, या मागणीसाठी महिला ठिणगीने मंगळवारी भाईंदर येथील अप्पर तहसील कार्यालच्या आवरात आंदोलन छेडले.

लोकमत पा. नं. 9.

# वीज कर्मचाऱ्यांचा 'शॉक'


## खासगीकरणाविरोधात तीन दिवस काम बंद; संपामुळे बत्ती गुल होणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : वीज वितरणाच्या खासगीकरणाला विरोध यासह ठाणे, मुलुंड, भांडुप, नवी मुंबई, बेलापूर, पनवेल, तळोजा व उरणमध्ये अदानी वीज कंपनीला वितरणाचा परवाना देऊ नये आदी मागण्यांसाठी ४ जानेवारीपासून (मंगळवारी रात्री १२ वाजेपासून) राज्यातील ८६ हजार वीज कामगार, अभियंते, अधिकारी व ४२ हजार कंत्राटी कामगार, सुरक्षा रक्षकांनी ७२ तासांचा संप पुकारला आहे. परिणामी, राज्यभरातील वीज यंत्रणा कोलमडून पडण्याची भीती व्यक्त होत आहे.

संपात ३१ संघटनांचे कर्मचारी सहभागी झाले आहेत. संपकाळात राज्यातील ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने देखील कंबर कसली आहे.

वीज कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनामध्ये त्यांच्या कोणत्याही आर्थिक मागण्या नाहीत. तर जनतेच्या मालकीचा वीज उद्योग टिकला पाहिजे. तो भांडवलदारांना विकता कामा नये. भांडवलदार नफा कमविण्याच्या उद्देशाने वीज वितरण क्षेत्रात येत आहेत, असा दावा महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी संघर्ष समितीने केला आहे.



### वीज गेली तर काय कराल?

**टोल फ्री क्रमांक**

१८००-२१२-३४३५
१८००-२३३-३४३५
/१९१२/ १९१२०

### ...तर एजन्सीदेखील बडतर्फ

महावितरणतर्फे नियुक्त करण्यात आलेल्या ज्या एजन्सी संपकाळात काम करणार नाहीत, त्याना बडतर्फ करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आवश्यक साहित्याची व्यवस्था करण्याचे निर्देश सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

### तोडग्यासाठी आज बैठक

४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस याच्यासोबत संपात सहभागी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे.

### ...तर तोटा वाढतच जाणार

१. भांडवलदार आले तर अनुदानित वीज बंद होईल. आदिवासी दुर्गम भागातील ग्राहकांना वीज मिळणार नाही. भांडवलदार नफ्याचे क्षेत्र ताब्यात घेतील. तोट्यात असलेले क्षेत्र महावितरणकडे राहील. त्यामुळे महावितरणचा तोटा वाढत जाईल.

२. त्यामुळे हे आंदोलन हाती घेण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी संघर्ष समितीकडून सांगण्यात आले. सरकारने यानंतरही वीज कंपन्यांच्या खासगीकरणाचे धोरण थांबविले नाही तर १८ जानेवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय संघर्ष समितीने घेतला आहे.

**मेस्मा लागू** विजेची सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे. त्यामुळे संबंधित सेवेतील कर्मचाऱ्यांना संपावर जाण्याबाबत प्रतिबंध करण्यात आला असून, राज्य सरकारने मेस्मा कायदा लावला आहे. त्याअंतर्गत कारवाई करण्यात येईल.

### संपकऱ्यांवर कारवाईचा बडगा

महावितरणने ठरवून दिलेली कामे न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्याविरोधात कडक कारवाई करण्यात येणार आहे. तर रजेवर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामावर रुजू होण्याचे आदेशही प्रशासनाने दिले आहेत.

### अशी घेणार खबरदारी

- वीज पुरवठ्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी मुख्यालयासह सर्व परिमंडल व मंडल कार्यालयांच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आले आहेत.
- हे नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार आहेत.
- एजन्सीचे कामगार, कंत्राटी कामगार, सेवानिवृत्त अभियंते व कर्मचारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत निरीक्षक व महाऊर्जा विभागातील अभियंत्यांना संपकाळात विविध उपकेंद्राच्या ठिकाणी नेमण्यात येणार आहे.

# हरवलेले मोबाईल पोलिसांकडून परत

## पोलिस स्थापनादिन सप्ताहानिमित्त मिरा रोडमध्ये उपक्रम

भाईंदर, ता. ३ (बातमीदार) : मिरा- भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयामार्फत नागरिकांना एक आगळी वेगळी भेट देण्यात आली आहे. गेल्या वर्षभरात मिरा रोड पोलिस ठाण्यात दाखल मोबाईल हरवल्याच्या तक्रारींपैकी पंधरा मोबाईल पोलिसांनी शोधून काढून ते संबंधित व्यक्तींना परत करण्यात आले. पोलिस स्थापना दिन सप्ताह निमित्त मिरा रोड पोलिस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांच्या हस्ते हे मोबाईल संबंधितांना देण्यात आले.

मिरा रोड पोलिस ठाण्यात गेल्या वर्षभरात बस, टॅक्सी, रिक्षा, दुकान या ठिकाणी विसरलेल्या अथवा हरवलेल्या मोबाईल फोनच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. या तक्रारींपैकी सुमारे एक ते दीड लाख रुपये किमतीचे हरवलेले एकूण पंधरा मोबाईला शोधण्यात मिरा रोड पोलिस यशस्वी ठरले. हे मोबाईल पोलिस स्थापना दिन सप्ताहनिमित्त आयोजित कार्यक्रमात परत करण्यात आले. यावेळी पोलिस उपायुक्त जयंत बजबळे, सहाय्यक पोलिस आयुक्त विलास सांनप, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयसिंह बागल तसेच अन्य पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मोबाईल हरवला अथवा चोरीला गेला असल्यास त्याचा गैरवापर होऊ नये यासाठी त्याची तक्रार पोलिस ठाण्यात करावी असे आवाहन पोलिसांनी केले.

### महिला सुरक्षा व सक्षमीकरणावर मार्गदर्शन

पोलिस स्थापना दिनानिमित्त पोलिसांच्या भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांकडून महाविद्यालयीन विद्यार्थिनींना महिला सुरक्षा व महिला सक्षमीकरण या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. मिरारोड येथील एल. आर. तिवारी महाविद्यालयातील अभियांत्रिकी शाखेच्या सुमारे १५० विद्यार्थिनींशी सहाय्यक पोलिस निरिक्षक तेजश्री शिंदे, उपनिरीक्षक स्नेहल तांबडे तसेच त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कोणतीही अडचण असल्यास विद्यार्थिनींनी ११२ या हेल्पलाईनवर किंवा पोलिस ठाण्याचे नंबर, पोलिस काका, पोलिस दिदी यांच्या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

← सकाळ 5 पा. 9.

लोकसत्ता पु.पा.१.

# वीज कर्मचाऱ्यांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर नियंत्रण कक्ष

## वीज व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी प्रयत्न

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** महावितरणमधील कर्मचारी, अधिकारी व अभियंत्यांच्या विविध संघटना यांच्या मार्फत ४ ते ६ जानेवारीपर्यंत विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. या संपाच्या पार्श्वभूमीवर वीज व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी महावितरण विभागाने नियंत्रण कक्ष कार्यरत केला आहे.

मुख्य कार्यालयाच्या निर्देशानुसार परिमंडलातील कल्याण एक आणि दोन, वसई व पालघर या चारही मंडळ कार्यालयात संप काळासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. संपाच्या कालावधीत वीजपुरवठा बाधित होणे, अपघात, वीज यंत्रणेचे नुकसान अथवा अपघात यासंदर्भात आपापल्या कार्यक्षेत्रातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून माहिती देण्याचे व सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.

कर्मचारी, अधिकारी, अभियंते तसेच कंत्राटी कामगार या संपात सहभागी होत आहेत. त्यामुळे या संपात नसणारे कर्मचारी, अभियंते, अधिकारी याशिवाय देखभाल-दुरुस्तीसाठीच्या एजन्सीसह इतर कंत्राटदारांचे कामगार, सेवानिवृत्त कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांच्या मदतीने संप काळात वीजपुरवठा अबाधित ठेवण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याची माहिती महावितरणने दिली आहे.

वसई, विरार, नालासोपारा, आचोळे, वाडा भागाचा समावेश असलेल्या वसई मंडल कार्यालयाच्या नियंत्रण कक्षासाठी ७८७५७६०६०१ व ७८७५७६०६०२ हे संपर्क क्रमांक दिले आहेत तर

पालघर, बोईसर, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा व विक्रमगडचा पालघर मंडळ कार्यालय नियंत्रण कक्षाचे ९०२८००५९९४ व ९०२८१५४२७ हे संपर्क क्रमांक दिले असून वीजेसंदर्भातील तक्रारी व माहिती देण्यासाठी आपापल्या कार्यक्षेत्रातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने वीज ग्राहकांना केले आहे.

# वसई-भाईंदरमधील ६८ बेपत्ता मुलांचे गूढ कायम

## वर्षभरात ६५० मुले-मुली बेपत्ता

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई:** २०२२ या वर्षात वसई विरार आणि मीरा भाईंदर शहरातून ६५० अल्पवयीन मुले-मुली बेपत्ता झाली होती. यापैकी ५८२ मुलामुलींचा शोध लागला असून त्यातील अद्याप ६८ मुले-मुली बेपत्ता आहेत.

वसई विरार शहरातून अल्पबीयन मुले-मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले आहे.. २०२२ या वर्षात वसई विरार आणि मीरा भाईंदर शहरातून ६५० अल्पवयीन मुले-मुली बेपत्ता झाले होते. त्यामध्ये १९६ मुले आणि ४५४ मुलींचा समावेश होता. या बेपत्ता मुला-मुलींच्या शोधासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. बेपत्ता मुला-मुलींपैकी ५८२ जणांचा शोध लागला आहे. त्यामध्ये १८६ मुले आणि ३९६ मुलींचा समावेश आहे, परंतु अद्याप ६८ मुले-मुली बेपत्ता आहेत.

**बेपत्ता आणि शोध**

| बेपत्ता | शोध लागला | अद्याप बेपत्ता |
|---|---|---|
| मुले – १९६ | मुले– १८६ | मुले– १० |
| मुली– ४५४ | मुली– ३९६ | मुली– ५८ |
| एकूण– ६५० | एकूण ५८२ | एकूण– ६८ |



बहुतांश प्रकरणात या मुलांना फूस लावून पळवले जाते. वेळीच या मुलांचा शोध लागत नसल्याने त्यांच्याबरोबर गैरप्रकार होत असतात. प्रेमप्रकरणात अल्पवयीन मुलींना फूस लावून पळविण्यात येते. त्यांच्या बाबतीत लैंगिक अत्याचाराचे प्रकार घडतात. संवेदनशील प्रकरणांचा लवकर तपास व्हावा यासाठी २०१३ पासून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी बेपत्ता झाल्यास अपहरणचा कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो.

# महामार्गावर वर्षभरात दीडशे अपघातांत ५९ जणांचा बळी

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई पूर्वेच्या भागातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे. वर्षभरात दीडशे अपघाताच्या घटना घडल्या असून त्यात ५९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ५४ जण गंभीर जखमी झाले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत महामार्गावर अपघातात मृत्यूंची संख्या जवळपास तीन पटीने वाढली आहे.

वसई पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. विविध भागांना जोडणारा महत्त्वाचा महामार्ग आहे. दिवसेंदिवस या राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची वर्दळही प्रचंड वाढली आहे. त्यामुळे महामार्गावर अतिवेगाने वाहने चालविणे, वाहनांवरील नियंत्रण सुटणे, काही भागांत रस्त्याची झालेली लेन कटिंग, मध्येच उभ्या केलेल्या वाहनांना धडका लागणे, अपुऱ्या दुभाजक, पथदिव्यांचा अभाव, पावसाळ्यात तयार झालेले खड्डे, अशा विविध कारणांमुळे महामार्गावर अधूनमधून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. दहिसर टोल नाका ते विरार शिरसाड या चिंचोटी महामार्ग पोलिसांच्या हद्दीत २०२२ मध्ये दीडशे अपघाताच्या घटना घडल्या आहेत. यात ५९ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर ५४ जण गंभीर जखमी झाले आहे. याआधी २०२१ मध्ये महामार्गावर १२० अपघात घडले होते त्यात १५ जणांचा मृत्यू झाला होता. तर ८६ जण जखमी झाले होते. यंदाच्या वर्षी अपघातात मृत्यू होण्याचे प्रमाण जवळपास तीन पटीने वाढले आहे.

## वर्षाअखेरीस उपाययोजना

महामार्गावर वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठीचे रमलर, रेडियम, ब्लिंकिंग सिग्नल, दिशादर्शक फलक, पाणी जाण्याचे मार्ग, संरक्षण जाळ्या अशा विविध समस्यांमुळे अपघाताच्या घटना घडत होत्या. यावर उपाययोजना करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. तरीही प्राधिकरणाने याकडे दुर्लक्ष केले होते. उद्योगपती सायरस मेस्त्री यांचा महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताच्या घटनेनंतर प्राधिकरण खडबडून जागे झाले असून वर्षाअखेर विविध ठिकाणी उपाययोजना करण्याचे काम सुरू केले आहे.

> “महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी व अपघातग्रस्तांना मदत मिळावी यासाठी महामार्ग पोलिसांचे प्रयत्न सुरूच आहेत. वाहनचालकांनी ही सतर्कता बाळगून वाहने चालवावीत
>
> - विठ्ठल चिंतामण, पोलीस उपनिरीक्षक महामार्ग पोलीस चिंचोटी विभाग

## अपघात आकडेवारी

| वर्ष | अपघात | जखमी | मृत्यू |
|---|---|---|---|
| २०२१ | १२० | ८६ | १५ |
| २०२२ | १५० | ५४ | ५९ |

लोकमत

# स्त्री सन्मानासाठी 'श्रमजीवी'चे तहसीलदार कार्यालयासमोर धरणे

## तहसीलदारांना निवेदन : आईचे नाव बंधनकारक असण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क,

**नालासोपारा** : स्त्री सन्मानासाठी सर्व शासकीय व खासगी दस्तऐवजांवर मुलाच्या नावापुढे वडिलांसोबत आईचेही नाव समाविष्ट करण्यासाठी श्रमजीवी संघटनेमार्फत पालघर जिल्ह्यातील विविध तालुक्यांच्या तहसील कार्यालयात मंगळवारी धरणे आंदोलन करण्यात आले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून वसई तहसीलदार कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यासाठी तहसीलदार उज्ज्वला भगत यांच्याद्वारे सादर करण्यात आले.



तहसीलदार कार्यालयासमोर 'श्रमजीवी'ने धरणे आंदोलन केले.

श्रमजीवी संघटना गेल्या ४० वर्षांपासून समाजातील गरीब, दुर्बल, आदिवासी आणि वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी कार्य करत आहे. समाजातील महिला वर्ग हा नेहमीच वंचित आणि दुर्लक्षित घटक मानला जातो. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा मूलभूत अधिकार प्रदान केला आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र महिला आणि विशेषतः माता या समानतेच्या अधिकारापासून वंचित आहेत. सन २०२२ हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष असून या वर्षात तरी महिलांना आणि भारतातल्या प्रत्येक मातेला तिचा समानतेचा अधिकार मिळावा, यासाठी स्त्रीने जन्म दिलेल्या तिच्या बाळाच्या नावापुढे वडिलांसोबत त्या जन्मदात्री मातेचे नावसुद्धा लागले गेले पाहिजे, या मागणीसाठी हे आंदोलन केले गेले.

सर्व शासकीय व खासगी आस्थापनांवर, दस्तऐवजांवर जिथे कोणत्याही व्यक्तीचे नाव लिहिण्याची सक्ती असते. तिथे नाव, मधले नाव आणि आडनाव असे रकाने असतात. यात एक रकाना वाढवून आईचे नाव भरणेही सक्तीचे करून सर्व मातांना समानतेचा अधिकार देण्यात यावा, याबाबत महाराष्ट्र सरकारने सकारात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणीचे आदेश सर्व संबंधितांना द्यावेत, अशी मागणी केली आहे. आंदोलनादरम्यान कार्याध्यक्ष स्नेहा दुबे, रामभाऊ वारणा, बाळाराम भोईर, विजय जाधव, आत्माराम ठाकरे, डॉमणिका डाबरे इत्यादी उपस्थित होते.

लोकमत

## पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन : १७ सिमेंट प्लांटना नोटिसा

# वसईचा महामार्ग परिसर धुळीच्या प्रदूषणाचे आगर!

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मुंबई - अहमदाबाद महामार्ग परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. परिसरातील झाडांच्या पानांवरही धुळीचे थर साचलेले दिसून येत आहेत. दरम्यान, पालघरचे खासदार राजेंद्र गावित यांनी अचानक या परिसराला भेट दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाने येथील १७ प्लांटला एक आठवड्याची कारणे दाखवा नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे.



पालघरचे खासदार राजेंद्र गावित अधिकाऱ्यांसह परिसराची पाहणी करताना.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सिमेंट तयार करणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये दररोज अवजड वाहने, मिक्सर तसेच वाळूची वाहने ये-जा करत असतात. मात्र, या कंपन्या कुठल्याही प्रकारचे पर्यावरणाचे नियम पाळत नसल्याने तसेच प्रदूषण रोखण्याची कुठलीच यंत्रणा नसल्याने या कंपन्यांमधून सतत धूळ, मातीचे प्रदूषण होत असते. मातीचे प्रमाण एवढे भयंकर असते की, महामार्ग धुळीने भरलेला दिसत असतो. या धुळीमुळे महामार्गावरून जाणारे वाहनचालक तसेच परिसरातील ग्रामस्थांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. महामार्गालगत दोन्ही बाजूने हिरवीगार वनराई आहे. हा परिसर निसर्गरम्य आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो, परंतु, या प्लांटमुळे हिरव्या वनसंपदेवरही गदा आली आहे. या महामार्गालगतची सर्व हिरवी झाडे ही धुरकट झालेली दिसत आहेत.

कंपन्यांमधून होणाऱ्या प्रदूषणाबाबत खासदार राजेंद्र गावित यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी कंपन्यांमधून कसलेही नियम पाळले जात नसल्याचे आढळून आले. प्लांट परिसरात नियमित पाण्याची फवारणी करणे आवश्यक आहे. तीदेखील केली जात नव्हती. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाच्या अधिकाऱ्यांची सारवासारव करताना तारांबळ उडाली होती.

### कारवाई का नाही?

**या भागात सातत्याने प्रदूषणाच्या तक्रारी येत असताना लक्ष का दिले नाही? या प्रश्नावर अधिकाऱ्यांना उत्तर देता आले नाही. खासदार पाहणीला येणार असल्याची माहिती प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी आधीच काही कंपन्यांना दिल्याने खासदारांनी या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. प्रदूषण करणाऱ्या सर्व कंपन्यांना तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.**

### नैसर्गिक नाला बुजवला

- खासदार गावित यांनी मालजीपाडा येथील एका सिमेंट प्लांटला भेट दिल्यावर या कंपनीलगतचा नाला बुजवला असल्याचे आढळून आले. कंपनीने माती आणि कचरा टाकून नाला बुजवला होता.
- यामुळे पावसाळ्यात महामार्गावर पाणी साचण्याची समस्या निर्माण होत आहे. या कंपनीवर तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही खासदारांनी यावेळी दिले.

Hello Vasai
Page No. 1 Jan 04, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# चोरी झालेले साहित्य परत मिळते का भाऊ?

मंगेश कराळे |लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत प्रत्येक पोलिस ठाण्यात चोरी घरफोडीचे सत्र सुरूच आहे. चोरीच्या दाखल गुन्ह्यांपैकी बरेच गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहेत. गुन्हे उघडकीस आणतानाच पोलिस चोरांकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करतात. तर कागदपत्रांची छाननी करून तक्रारदारांना त्यांचे चोरीला गेलेले साहित्य परतही केले जाते.

लोकमत इन्फोग्राफिक्स



## वर्षभरात शहरात चोरीच्या अनेक घटना

पोलिस आयुक्तालयात २०२२ यावर्षी सर्वाधिक वाढ झाली ती घरफोडीच्या घटनांमध्ये. घरफोडीचे ५३९ गुन्हे दाखल असून, त्यातील २९२ गुन्हे उघड झाले आहे. चोरीच्या अनेक घटनांचा छडाही लागला आहे.

## कोट्यवधीचे साहित्य चोरीस

मागील ११ महिन्यांत चोरीच्या घटनांची आकडेवारी मोठ्या प्रमाणात आहे. कोट्यवधी रुपयांचे साहित्य, मुद्देमाल चोरीला गेला आहे. तर काही घरातून सोन्या-चांदीचे दागिनेही चोरांनी लंपास केले आहेत.

## लाखोंचे साहित्य मिळाले परत

मागील १२ महिन्यांच्या झालेल्या चोरीच्या घटनेत अनेक प्रकरणांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. यातील लाखोंचे साहित्य जमा करून ते मालकांना परत केले आहे; परंतु ज्या दागिन्यांची कागदपत्रे उपलब्ध नाहीत ते दागिने परत करण्यास अडचण येते.

## वाहनांच्या चोरीत लक्षणीय वाढ

बारा महिन्यांचा विचार केल्यास जिल्ह्यात दुचाकी व चारचाकी चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. वाहन चोरीचे ७७५ गुन्हे दाखल असून, पोलिसांनी अनेक चोरीच्या घटनांचा तपास पूर्ण ३४९ गुन्ह्यांची उकल केली आहे. तरीही वाहन चोरीच्या घटना सुरूच आहेत. अनेक चोरटे जिल्ह्यातील वाहने चोरून परराज्यात विक्री करत असतात.

## चोरींच्या घटनांचा आलेख चढताच

मागील काही वर्षातील चोरीच्या घटनांचा विचार केल्यास हा आकडा वाढतोच आहे. पोलिस विभागाकडून गस्त घातली जात असली तरीही चोरटे हात साफ करीत असल्याचे दिसून येत आहे.

घरफोडी, चोरी होऊ नयेत, यासाठी रहिवाशांनी बाहेरगावी जाताना मौल्यवान दागिने बँकेत किंवा विश्वासू नातेवाइकांकडे ठेवावेत. घराची खिडकी, दरवाजे व्यवस्थित बंद करून आपण बाहेर जात आहोत, याबाबत शेजाऱ्यांना कल्पना द्यावी.

**- पोलिस प्रशासन**

लोकमत

# संपाच्या पार्श्वभूमीवर पालघर-वसईत दक्षता

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : महावितरणमधील कर्मचारी, अधिकारी व अभियंत्यांच्या संघटना बुधवारी मध्यरात्रीपासून ७२ तासांच्या संपावर जात आहेत. या संपाच्या पार्श्वभूमीवर पालघर व वसई परिमंडळातील ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक तयारी मुख्य अभियंत्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

वसई व पालघर मंडळ कार्यालयांत संप काळासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. संपाच्या कालावधीत वीजपुरवठा बाधित होणे, अपघात, वीज यंत्रणेचे नुकसान अथवा अपघात यासंदर्भात कार्यक्षेत्रातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून माहिती देण्याचे व सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

कर्मचारी, अधिकारी, अभियंते तसेच कंत्राटी कामगार संपात सहभागी होत आहेत. त्यामुळे या संपात नसणारे कर्मचारी, अभियंते, अधिकारी व देखभाल दुरुस्तीसाठी एजन्सीसह इतर कंत्राटदारांचे कामगार, सेवानिवृत्त कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांच्या मदतीने संप काळात वीजपुरवठा अबाधित ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. वसई मंडळ कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाचे ७८७५७६०६०१ आणि ७८७५७६०६०२ हे मोबाईल क्रमांक आहेत, पालघर मंडळ कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाचे ९०२८००५९९४ आणि ९०२८९५४२७८ हे मोबाईल क्रमांक आहेत, असे महावितरणकडून सांगण्यात आले.

लोकमत

# थर्टी फर्स्टला पार्ट्या अनेक; कारवाई शून्य

## रात्रभर गस्त घातल्याचा प्रशासनाचा दावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईत ३१ डिसेंबरच्या रात्री ठिकठिकाणी बेकायदेशीरपणे पार्ट्यांचे आयोजन करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. रिसॉर्ट, ढाबे तर रात्रभर सुरू होते. मात्र, पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने बेकायदा पार्ट्या आणि दारूविक्रीकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्याचे स्थानिकांनी सांगितले. दरम्यान, कारवाईसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विविध पथके स्थापन केली होती. रात्रभर ही पथके गस्त घालत होती. ६१ परवाने घेतल्याने कारवाई झाली नसल्याने उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक सुधाकर कदम यांनी 'लोकमत'ला सांगितले.

परवाने घेऊन ३१ डिसेंबरच्या रात्री नवीन वर्षाचे स्वागत करा, असे आवाहन करून त्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे दवंडी पिटविली होती. वसई-विरारच्या किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणावर रिसॉर्ट, कॅफे आणि हॉटेल्स आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारच्या मद्यविक्रीचा परवाना नाही. तरीही ३१ डिसेंबरच्या रात्रीपासून पहाटेपर्यंत नवीन वर्षाच्या पार्टीत मद्य वितरित केले जात होते. पैकी एकाही ठिकाणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली नाही. अर्नाळा पोलिसांनीही कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही, असा स्थानिकांचे म्हणणे आहे.

### वसई म्हणजे मिनी गोवा

गोव्याप्रमाणेच वसईतील समुद्र किनारी जणू मिनी गोवाच थाटला होता. राजोडीच्या समुद्रकिनाऱ्याला लागूनच थाटण्यात आलेल्या ३० ते ३५ अनधिकृत हॉटेल्स, कॅफेमध्ये बिनधास्तपणे मद्यपान सुरू होते. तर काहींना समुद्रकिनारी टेबल थाटून तेथे ग्राहकांना सेवा दिली जात होती, असा आरोप स्थानिक करीत आहेत.

लोकमत

न्यूज Inbox

# विरारमध्ये मटका जुगाऱ्यांवर कारवाई

**नालासोपारा :** विरारमध्ये मटका जुगाऱ्यांवर कारवाई करत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. बोळींजच्या पद्मावती नगर येथील देव रेसिडेन्सी येथे सोमवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास विनापरवाना बेकायदेशीरपणे आकडे लावून त्यावर पैसे लावून मटका जुगार चालवत असल्याची माहिती अर्नाळा सागरी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तेथे छापा मारून हितेन सोमय्या, सुरेश सोमय्या व मुकेश सोमय्या यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रजिस्टर, कलर प्रिंटर, मोबाइल व रोख रक्कम असा एकूण ८ लाख ४७ हजार ६५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. तीन आरोपीविरोधात महाराष्ट्र जुगार कायदा कलम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Jan 04, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

न्यूज Inbox

# गांजासह दोघांना ठोकल्या बेड्या

**नालासोपारा :** पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना बिलालपाडा गाव येथील तलावाजवळ सोमवारी संध्याकाळी काही जण गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार संध्याकाळी सहाच्या सुमारास तेथे पोलिसांनी सापळा रचला असता दोन जण संशयास्पदरित्या आढळून आले. त्यांचा शिताफीने पाठलाग करुन ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे गांजा आढळून आला आहे. नमैदुल शेख उर्फ बंगाली (३५) व सुनील पवार (३४) अशी या दोन सराईत आरोपींची नावे असून सुनील पवार याच्या ताब्यातून ५ किलो ५० ग्रॅम वजनाच्या गांजा, रोख रक्कम व दुचाकी असा एकूण १ लाख २९ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल पेल्हार पोलिसांनी जप्त केला आहे.

Mumbai Main
Page No. 4 Jan 04, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# महिलेच्या गळ्यातून सोनसाखळी चोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : नालासोपारा येथे महिलेच्या गळ्यातून सोनसाखळी खेचून नेल्याची घटना घडली आहे. छेडा नगर येथील न्यू नालंदा इमारतीत राहणाऱ्या अश्विनी खेडेकर (५०) या सोमवारी संध्याकाळी साडेचारच्या सुमारास अमी पार्क येथील सार्वजनिक रस्त्यावरून पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील दहा ग्रॅम वजनाची ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून ते पळून गेले. नालासोपारा पोलिसांनी सोनसाखळी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Jan 04, 2023
Powered by: erelego.com

सकाळ

# हरवलेले मोबाईल पोलिसांकडून परत

## पोलिस स्थापनादिन सप्ताहानिमित्त मिरा रोडमध्ये उपक्रम

भाईदर, ता. ३ (बातमीदार) : मिरा- भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयामार्फत नागरिकांना एक आगळी वेगळी भेट देण्यात आली आहे. गेल्या वर्षभरात मिरा रोड पोलिस ठाण्यात दाखल मोबाईल हरवल्याच्या तक्रारींपैकी पंधरा मोबाईल पोलिसांनी शोधून काढून ते संबंधित व्यक्तींना परत करण्यात आले. पोलिस स्थापना दिन सप्ताह निमित्त मिरा रोड पोलिस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांच्या हस्ते हे मोबाईल संबंधितांना देण्यात आले.

मिरा रोड पोलिस ठाण्यात गेल्या वर्षभरात बस, टॅक्सी, रिक्षा, दुकान या ठिकाणी विसरलेल्या अथवा हरवलेल्या मोबाईल फोनच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. या तक्रारींपैकी सुमारे एक ते दीड लाख रुपये किमतीचे हरवलेले एकूण पंधरा मोबाईला शोधण्यात मिरा रोड पोलिस यशस्वी ठरले. हे मोबाईल पोलिस स्थापना दिन सप्ताहनिमित्त आयोजित कार्यक्रमात परत करण्यात आले. यावेळी पोलिस उपायुक्त जयंत बजबळे, सहाय्यक पोलिस आयुक्त विलास सानप, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयसिंह बागल तसेच अन्य पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मोबाईल हरवला अथवा चोरीला गेला असल्यास त्याचा गैरवापर होऊ नये यासाठी त्याची तक्रार पोलिस ठाण्यात करावी असे आवाहन पोलिसांनी केले.

### महिला सुरक्षा व सक्षमीकरणावर मार्गदर्शन

पोलिस स्थापना दिनानिमित्त पोलिसांच्या भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांकडून महाविद्यालयीन विद्यार्थिनींना महिला सुरक्षा व महिला सक्षमीकरण या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. मिरारोड येथील एल. आर. तिवारी महाविद्यालयातील अभियांत्रिकी शाखेच्या सुमारे १५० विद्यार्थिनींशी सहाय्यक पोलिस निरिक्षक तेजश्री शिंदे, उपनिरीक्षक स्नेहल तांबडे तसेच त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कोणतीही अडचण असल्यास विद्यार्थिनींनी ११२ या हेल्पलाईनवर किंवा पोलिस ठाण्याचे नंबर, पोलिस काका, पोलिस दिदी यांच्या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

Mumbai, Palghar-Today
04/01/2023 Page No. 1

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक. २५६ | बुधवार ०४ जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०४

# मटका जुगार खेळणाऱ्या ३ जणांवर तपास शाखेने कारवाई केली

**वसई.** अर्नाळा पोलिसांच्या तपास शाखेच्या पथकाने मटका जुगाराच्या आरोपींवर कारवाई करून आठ लाखांहून अधिक किमतीचा माल जप्त केला आहे. अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. डीसीपी सुहास बावचे (परिमंडळ ०३), एसीपी चंद्रकांत जाधव, वरिष्ठ पीआय (अर्नाळा पोलीस स्टेशन) राजू माने, एपीआय रणजितसिंह परदेशी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देव रेसिडेन्सी बिल्डिंग, पद्मावती नगर विरार (प.) येथे काही लोक नंबरवर नंबर लावून बेकायदेशीरपणे मटका जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली, २ जानेवारी रोजी सकाळी १६.१० वाजण्याच्या सुमारास गुप्त



खबरदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार प्राप्त, अर्नाळा पोलिस ठाण्याच्या पथकाने छापा टाकला, जणू काही एक व्यक्ती कोणालातरी मोबाईलवर काही नंबर सांगत आहे आणि दोन जण मोबाईलवर बोलत आहेत. दुसऱ्या व्यक्तीकडे मटका जुगाराचे नंबर दिसले, कागदावर नंबर लिहिलेले आणि पैसे दिसले, सदर कारवाई दरम्यान १) ००,००/- रु. मटका जुगाराच्या रजिस्टर कागदावर वेगवेगळ्या तारखांचे क्रमांक लिहिलेले आहेत, त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळावरून विविध प्रकारचे साहित्य जप्त केले असून, एकूण ८,४७,६५० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाईत आरोपी हितेन यांनी सुरेश सोमय्या (४२), सुरेश मगनलाल सोमय्या आणि मुकेश सुरेश सोमय्या यांच्याविरुद्ध अर्नाळा सागरी पोलिसात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई,

मुंबई केसरी टाइम्स

www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १५ अंक : २०९ बुधवार 04 जनवरी 2023 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 08

# पुलिस के गिरफ्त में आए दो गांजा तस्कर

**वसई।** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत पेल्हार पुलिस ने नालासोपारा पूर्व क्षेत्र में दो गांजा तस्करों को गिरफ्तार किया है।



इन दोनों के खिलाफ पेल्हार थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। मिली जानकारी के अनुसार, पेल्हार पुलिस ने 2 जनवरी को गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के बिलाल पाडा क्षेत्र से दो मैदुल नूरइस्माइल शेख उर्फ बंगाली (35) और सुनील पवार (34 ) गांजा तस्करों को गिरफ्तार किया है। इनके पास से 5 किलो 50 ग्राम वजन गांजा जप्त किया है। पुलिस ने बताया कि गांजा कीमत 73,500 रुपये आकी गयी है। दोनो आरोपियों के ऊपर उक्त थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

9 राज्य, 18 संस्करण मुंबई, पुणे, रांची, लखनऊ, कोलकाता, जयपुर, नई दिल्ली, इंदौर, भोपाल, सागर, उज्जैन, जबलपुर, ग्वालियर, रतलाम, रायपुर, बिलासपुर, दुर्ग, जालंधर, से एक साथ प्रकाशित | मूल्य ₹ 5.00

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, बुधवार, 4 जनवरी 2023

निष्पक्ष नज़र, निष्पक्ष खबर

देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

सुविचार

सच्चाई और अच्छाई के लिए चाहे पूरी दुनिया घूम लो, अगर आपके खुद के अंदर नहीं तो कहीं नहीं मिलेगी।

अंदर पढ़ें पेज 08

# पेल्हार पुलिस के गिरफ्त में आए दो गांजा तस्कर

**वसई।** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत पेल्हार पुलिस ने नालासोपारा पूर्व क्षेत्र में दो गांजा तस्करों को गिरफ्तार किया है। इन दोनों के खिलाफ पेल्हार थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। मिली जानकारी के अनुसार, पेल्हार पुलिस ने 2 जनवरी को गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के बिलाल पाडा क्षेत्र से दो मैदुल नूरइस्माइल शेख उर्फ बंगाली (35) और सुनील पवार (34 ) गांजा तस्करों को गिरफ्तार किया है। इनके पास से 5 किलो 50 ग्राम वजन गांजा जप्त किया है। पुलिस ने बताया कि गांजा कीमत 73,500 रुपये आकी गयी है। दोनो आरोपियों के ऊपर उक्त थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-201 मुंबई, बुधवार 4 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# मटका जुगार पर शिकंजा, तीन पर कार्रवाई

**वसई:** मटका जुआ चलाने वाले आरोपियों के विरुद्ध अर्नाला पुलिस की डिटेक्शन ब्रांच की टीम ने कार्रवाई कर 8 लाख से ज्यादा का माल बरामद किया है। यह जानकारी पुलिस ने मंगलवार को दी है।यह कार्रवाई डीसीपी सुहास बावचे (परिमंडल 03),एसीपी चंद्रकांत जाधव,सीनियर पी.आई (अर्नाला थाना) राजू माने,ए.पी.आई रणजित सिंह परदेशी के नेतृत्व में पुलिस अधिकारी व कर्मचारी ने की है, पुलिस ने बताया कि अर्नाला सागरी थाना क्षेत्र के देव रेजीडेंसी बिल्डिंग, पद्मावती नगर विरार (प.) में कुछ लोग अवैध रूप से नंबरों पर पैसा लगाकर मटका जुआ खेल रहे है,2 जनवरी को लगभग 16.10 बजे गुप्त मुखबिर से सूचना प्राप्त हुई,मिली जानकारी के तहत अर्नाला थाने की टीम ने छापेमारी की,जैसे एक शख्स किसी को मोबाइल पर कुछ नंबर बता रहा था और दो शख्स मोबाइल पर कुछ बात कर रहे थे।उक्त शख्स के मोबाइल फोन की जांच की गई तो उसके मोबाइल फोन में मटका जुए के नंबर देखे गए,दूसरी शख्स के पास कागज और पैसे पर लिखे आंकड़े दिखाई दिए,उक्त कार्रवाई के दौरान 1) 00,00/- रु. वह मटका जुए का रजिस्टर पेपर जिस पर अलग-अलग तारीख के नंबर लिखे होते हैं,पुलिस के मुताबिक, घटनास्थल से विभिन्न प्रकार के सामग्री जप्त की गई है,कुलमिलाकर 8,47,650 रुपये का माल जप्त किया गया है।उक्त कार्रवाई में आरोपी हितेन सुरेश सोमय्या ( 42), सुरेश मगनलाल सोमय्या व मुकेश सुरेश सोमय्या के ऊपर अर्नाला सागरी पुलिस में विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज किया गया है।

# पांच किलो गांजा के साथ दो गिरफ्तार

**वसई:** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत पेल्हार पुलिस ने नालासोपारा पूर्व क्षेत्र में दो गांजा तस्करों को गिरफ्तार किया है। इन दोनों के खिलाफ पेल्हार थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। मिली जानकारी के अनुसार, पेल्हार पुलिस ने 2 जनवरी को गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के बिलाल पाडा क्षेत्र से दो मैदुल नूरइस्माइल शेख उर्फ बंगाली (35) और सुनील पवार (34 ) गांजा तस्करों को गिरफ्तार किया है। इनके पास से 5 किलो 50 ग्राम वजन गांजा जप्त किया है। पुलिस ने बताया कि गांजा कीमत 73,500 रुपये आकी गयी है। दोनो आरोपियों के ऊपर उक्त थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

दैनिक समाचार पत्र | लखनऊ, कानपुर, उन्नाव, झाँसी, मथुरा व प्रयागराज से प्रसारित | RNI NO - UPHIN2007/22822
खबर सिर्फ जनहित के लिए
पब्लिक पॉवर
सूर्या न्यूज़ 24
आपकी बुलन्द आवाज़
लखनऊ,बुधवार,04,जनवरी,2023, वर्ष 06, अंक :104 पृष्ठ :08, मूल्य 2रू/-

# पकड़े गए दो गांजा तस्कर,माल जप्त

मुंबई पवन पंडित

वसई। एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत पेल्हार पुलिस ने नालासोपारा पूर्व क्षेत्र में दो गांजा तस्करों को गिरफ्तार किया है। इन दोनों के खिलाफ पेल्हार थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। मिली जानकारी के अनुसार, पेल्हार पुलिस ने 2 जनवरी को गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के बिलाल पाडा क्षेत्र से दो मैदुल नूरइस्माइल शेख उर्फ बंगाली (35) और सुनील पवार (34 ) गांजा तस्करों को गिरफ्तार किया है। इनके पास से 5 किलो 50 ग्राम वजन गांजा जप्त किया है। पुलिस ने बताया कि गांजा कीमत 73,500 रुपये आकी गयी है। दोनो आरोपियों के ऊपर उक्त थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

दैनिक आमची मुंबई
णे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
र्ष : ११ | अंक : २५६ | बुधवार ०४ जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ८

# दोन गांजा तस्कर पोलिसांनी पकडले

**वसई.** MBBV पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणाऱ्या पेल्हार पोलिसांनी नालासोपारा पूर्व परिसरात दोन गांजा तस्करांना अटक केली आहे. या दोघांविरुद्ध पेल्हार पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २ जानेवारी रोजी गुप्त माहितीच्या आधारे पेल्हार पोलिसांनी नालासोपारा पूर्वेकडील बिलाल पाडा परिसरातून मैदुल नूरिसमाईल शेख उर्फ बंगाली (३५) आणि सुनील पवार (३४) या दोन गांजा तस्करांना अटक केली होती. त्यांच्याकडून ५ किलो ५० ग्रॅम वजनाचा भांग जप्त करण्यात आला आहे. गांजाची किंमत अंदाजे ७३,५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दोन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.